RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १२३] सोमवार, ऑक्टोबर ६, २०२५/आश्विन १४, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४४५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### जलसंपदा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक बीसीआर २०२१/प्र.क्र.३/ई(सीआर).— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद-३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख अधिक्रमित करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या, जलसंपदा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवेतील मुख्य अभियंता (विद्युत), गट-अ या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस, जलसंपदा विभागातील महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवेतील, मुख्य अभियंता (विद्युत), गट-अ या पदाचे (सेवाप्रवेश) नियम, २०२५, असे म्हणावे.

२. या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवेतील, मुख्य अभियंता (विद्युत), गट-अ या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असणारे मुख्यमंत्री, असा आहे;

(ख) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे;

(ग) "पदवी" याचा अर्थ, विद्युत अभियांत्रिकीमधील सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, असा आहे;

(घ) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग, असा आहे;

(ङ) “पदोन्नतीसाठी पात्रता” याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाने, वेळोवेळी, केलेले नियम, घेतलेले निर्णय किंवा काढलेले आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींना अनुसरून असलेली पदोन्नतीसाठीची पात्रता, असा आहे;

(च) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

३. महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवेतील, मुख्य अभियंता (विद्युत), गट-अ पदावरील नियुक्ती, अधीक्षक अभियंता (विद्युत), गट-अ पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि या पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा असणाऱ्या आणि विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी धारण केलेल्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल :

परंतु, अधीक्षक अभियंता (विद्युत), गट-अ पद धारण करणारी आणि या पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा असणारी योग्य व्यक्ती उपलब्ध न झाल्यास, ज्येष्ठतेच्या आधारे, अधीक्षक अभियंता (विद्युत), गट-अ पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा असणाऱ्या योग्य व्यक्तीची मुख्य अभियंता (विद्युत), गट-अ या पदावर नियुक्ती करण्यात येऊ शकेल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, शासनाने, त्याबाबतीत, वेळोवेळी, केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्त करावयाच्या व्यक्तीने, उक्त पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण केलेले नसेल किंवा असे प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, ती, शासनाने, त्याबाबतीत, वेळोवेळी, विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीची सेवाज्येष्ठता सूची राज्य स्तरावर ठेवण्यात आल्यामुळे उक्त व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

७. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर, शासनाने, वेळोवेळी, निर्गमित केलेले कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दीपक कपूर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, Dated the 6th October 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.BCR 2021/C.R.3/E(CR) .— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating the recruitment to the post of the Chief Engineer (Electrical), Group -A in the Maharashtra Service of Electrical Engineers, under the administrative control of Water Resources Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Chief Engineer (Electrical), Group- A in the Maharashtra Services of Electrical Engineers, in the Water Resources Department ( Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means the Chief Minister, who is competent to appoint a candidate to the post of Chief Engineer (Electrical) Group-A, in the Maharashtra Service's of Electrical Engineers in the Government Service;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*c*) "Degree" means a degree of a statutory University in the Electrical Engineering or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*d*) "Department" means the Water Resources Department of the Government of Maharashtra;

(*e*) "Eligibility for Promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified in rules, resolutions or orders issued by the General Administrative Department, from time to time ;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Chief Engineer (Electrical), Group-A, shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Superintending Engineer (Electrical), Group-A in the Maharashtra Service's of Electrical Engineers, having not less than five years of regular and continuous service on that post and possessing a degree in Electrical Engineering:

Provided that, where a suitable person holding the post of Superintending Engineer (Electrical), Group-A having not less than five years of regular and continuous service on the post is not available, then a suitable person on the basis of seniority having not less than three years of regular and continuous service on the post of Superintendent of Engineers (Electrical) may be appointed to the post of the Chief Engineer (Electrical), Group- A.

4. A person to be appointed to post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

5. A person to be appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

6. A person to be appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra, as the seniority list of the said post is maintained at the State level.

7. The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government Servant in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, shall also be applicable to the Government Servant appointed to the post mentioned in rule 3.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK KAPOOR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.